श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
विद्युत विभाग
दिनांक :- ०४-०६-२०२४

## * साईभक्तांना विनम्र आवाहन *

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
पोस्ट :- शिर्डी – ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहमदनगर
फोन नं.-०२४२३-२५८९८९,२५८९९८ फॅक्स नं.-२५८८७०
E-Mail -electrical.dept@sai.org.in ,website: - www.sai.org.in

---

### * साईभक्तांना विनम्र आवाहन *

**श्री साईबाबा संस्थान मार्फत साजरे करणेत येणा-या "श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२४" निमित्त** संस्थानचे खालीलप्रमाणे इमारतींचे दर्शनी भागावर (विनामुल्य) देणगी स्वरुपात आकर्षक अशी विद्युत रोषणाई सजावट करण्याचे नियोजन आहे.

**(०१) मंदिर परिसर बाहेरील बाजू (नगर मनमाड रोड )**
**(०२) शांतिनिवास व भक्तनिवास इमारत**
**(०३) नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम)**
**(०४) साईआश्रम भक्तनिवास**
**(०५) साई धर्मशाळा**
**(०६) द्वारावती भक्तनिवास**
**(०७) श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय**
**(०८) शैक्षणिक संकुले**

तरी सर्व साईभक्तांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत आव्हान करणेत येते की, जे साईभक्त उपरोक्त नमुद केलेल्या इमारतीवर दि.२०-०७-२०२४ ते २२-०७-२०२४ या कालावधीत देणगी स्वरुपात (विनामुल्य) आकर्षक अशी विद्युत रोषणाई करणेस इच्छूक असतील असे साईभक्तांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नांवे अर्ज करुन सदर अर्जाची सॉफ्ट कॉपी संस्थानचे ई-मेल electrical.dept@sai.org.in , kishor.gawali@sai.org.in वर तसेच हार्ड कॉपी दि ०६-०७-२०२४ रोजी सायं.५:०० वा.पर्यंत अथवा तत्पुर्वी संस्थान कार्यालयात जमा करावीत.

---

***खालीलप्रमाणे अटी-शर्तीस अधिन राहून काम करणे बंधनकारक राहील.***

०१). विद्युत रोषणाई करतांना सुरक्षा नियमांचे पालन करावे.
०२). सदरचे काम चालू असतांना साईभक्तास कोणतीही इजा होणार नाही यांची काळजी घेणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहिल.
०३). विद्युत रोषणाई करतांना अथवा त्यानंतर सदर कामामुळे काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
०४). विद्युत रोषणाईचे कामामुळे वरील पवित्र इमारतींचे काहीही नुकसान होऊ नये याची खबरदारी घ्यावी.
०५). विद्युत रोषणाई करणारे कलाकारांचे पोलिस व्हेरीफिकेशन करणे आपणावर बंधनकारक राहील. पोलिस व्हेरीफिकेशन केलेचे प्रमाणपत्र व संबंधीत कलाकारांचे आधारकार्ड व ०२ फोटो दि.१०-०७-२०२४ पर्यंत विद्युत विभाग कार्यालयाकडे सादर करणे आपणावर बंधनकारक राहील. त्यानंतर कलाकारांना काम करणेसाठी तात्पुरते स्वरुपात संस्थानचे संरक्षण विभागामार्फत ओळखपत्र देण्यात येतील.
०६). मंदिर परिसरात विद्युत रोषणाईचे काम करतांना परिसरात मोबाईल आणणे व वापरणे बंदी आहे यांची काळजी घेणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहिल.
०७). विद्युत रोषणाई करतांना योग्य ती खबरदारी घेणे आपणांवर बंधनकारक राहिल.

(गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**APPROVED / NOT APPROVED**

Signed by
Goraksha Gadilkar
**(Goraksha Gadilkar)**
Gorakshа Mahadeo Gadilkar
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**
Date: 15-06-2024 21:14:28